|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)**

(Formerly North Maharashtra University, Jalgaon)

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/९४३/२०२१ दिनांक: ०४.०५.२०२१

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र
विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य तसेच
मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक........

**विषय** :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उन्हाळी सत्रातील माहे मे, जून, जुलै २०२१ मध्ये होणाऱ्या परीक्षांकरीता विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / परिसंस्थांसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याबाबत

**संदर्भ**:- विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ७६/२०२१,जा.क्र.उमवि/७-अ/माहे मे, जून,जुलै-२०२१/ ९१४/२०२१, दिनांक ०३/०५/२०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भांकित परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उन्हाळी सत्रातील माहे मे, जून, जुलै २०२१ मध्ये होणाऱ्या परीक्षांकरीता विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / परिसंस्थांसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याबाबतचा कार्यक्रम कळविण्यात आलेला असून, या परिपत्रकातील अ.क्र.२२ व २४ (III) अ),ब) आणि क) वरील सुचना या पत्राद्वारे वगळण्यात येत आहे.

तसेच परीक्षा अर्ज सादर करतेवेळी संबंधित विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण उद्‌भवू नये तसेच विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणीचे निराकरण करणेसाठी प्रत्येक महाविद्यालयाने परीक्षा समन्वयकाची नियुक्ती करावी व परीक्षा समन्वयकाचे नांव, मोबाईल क्रमांक व ई-मेल आय.डी. इत्यादी बाब महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण ज्या-त्या महाविद्यालयाने त्यांचे स्तरावर करावे. केवळ अपवादात्मक परिस्थितीतच विद्यापीठास सूचित करावे.

**कोवीड-१९ च्या अनुषंगाने महाविद्यालयास पुन:श्च कळविण्यांत येते की, Online परीक्षा अर्ज व Online शुल्क भरणेसाठी Digital University Portal [http://nmuj.digitaluniversity.ac] वर उपलब्ध असलेल्या Online Examination Form Submission या सुविधेव्दारे सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्यासंदर्भात आपल्या स्तरावर प्रोत्साहित करावे, जेणेकरुन कोवीड-१९ च्या प्रादुर्भावास आळा बसेल. परीक्षा अर्ज भरणेसाठी विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालयात बोलवू नये व विद्यार्थ्यांनी देखील महाविद्यालयात जाऊ नये.**

**<u>ऑन लाईन परीक्षा अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना खालील सूचना देण्यांत याव्यात.</u>**

**<u>महत्वाच्या सुचना</u>ः-**

**१) परीक्षा अर्ज भरतेवेळी ऑनलाईन फी भरण्यासाठी शक्यतो डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकिंगचा वापर करावा.**

**२) यु.पी.आय.व्दारे भरणा शक्यतो टाळावा.**

**३) ऑनलाईन परीक्षा फी भरतेवेळी काही कारणास्तव विद्यार्थ्यांच्या अकाऊंटमधून फी डेबिट झाली, तथापि, फॉर्म भरला गेला नसेल तर, पुन्हा पेमेंट करु नये.**

**४) ज्यांची परीक्षा फी अकाऊंटमधून डेबिट झाली, परंतु फॉर्म भरला गेला नाही, अशा विद्यार्थ्यांचे फॉर्म तीन ते चार दिवसांमध्ये बँक reconciliation नंतर auto submit होईल. तरी त्यासाठी पुन्ही फी भरण्याची घाई विद्यार्थ्यांनी करु नये.**

वरील बाबी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व परिपत्रकाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



(भ. प्र. पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

८